दिव्य मराठी
जळगाव सिटी 28-07-2023

# गौरी महाजनला जिल्हास्तरावर योगासन स्पर्धेत दोन सुवर्णपदक

प्रतिनिधी | जळगाव

महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन बृहन्महाराष्ट्र योगा परिषद व जळगाव जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने जळगाव जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा मूळजी जेठा महाविद्यालयाच्या सोहम योगा विभागाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये घेण्यात आली. त्यात १४ ते १८ मुलींच्या वयोगटात गौरी गणेश महाजनने ट्रॅडिशनल योगासन, आर्टिस्टिक योगासन एकेरी या दोन प्रकारात दोन सुवर्णपदक पटकावले.

स्पर्धेत ७० विद्यार्थी आणि खेळाडू सहभागी झाले होते. गौरी महाजनला



प्रमाणपत्र स्वीकारताना गौरी महाजन.

शशिकांत वडोदकर, सतीश मोहगावकर, डॉ. देवानंद सोनार, नीलेश वाघ, प्रा. पंकज खासबागे यांच्या हस्ते प्रावीण्य प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. गोवा येथे चौथी नॅशनल योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप फेडरेशनच्या स्पर्धेत ती राष्ट्रीय पातळीवर सहभागी होणार आहे.